मराठवाड्यातील कॉंग्रेस (स) - एक अभ्यास

( १९८० - १९८५ )

# प्र क र ण ति स रे

# कॉं ग्रे स (स) चा उ द य

===/////===

# प्रकरण तिसरे

## समाजवादी काँग्रेसचा उदय

महाराष्ट्रातील पुरोगामी लोकशाही दलाचे सरकार सत्तेवर आल्यानंतरच्या कालावधीत शरद पवार व त्यांच्या समांतर काँग्रेसने राज्यात आपली शक्ती उभी करण्यासाठी प्रयत्न केला. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत समांतर काँग्रेसला चांगल्या जागा मिळाल्यामुळे शक्ती वाढत गेली.

दुस-या बाजूला काँग्रेस (स्व) च्या संघटनात्मक पातळीवर राज्यात निराशा दिसत होती. वसंतदादा पाटील, नरेंद्र तिडके, यशवंतराव मोहिते हे प्रमुख नेते इंदिरा काँग्रेसमध्ये जाण्यास उत्सुक होते पण यशवंतराव चव्हाण या निर्णयाच्या विरोधात ठाम होते. यशवंतराव चव्हाण स्वत: काँग्रेस (स्व) मध्येच होते पण त्यांचे राज्यातील समर्थक मात्र समांतर काँग्रेसच्या नांवावर पुरोगामी लोकशाही दलाच्या आघाडीच्या सरकारमध्ये होते. यामुळे वसंतदादा पाटील व इतर पुढा-यांचा असंतोष भडकत चालला होता. कारण यशवंतराव चव्हाणांचे शरद पवार व त्यांच्या सहका-यांना समर्थन होते ही गोष्ट उघडच दिसत होती.

शरद पवारांनी राज्यातील सत्ता हाती आल्यानंतर देश पातळीवरील काँग्रेस (स्व) च्या प्रमुख नेत्यासोबत संपर्क साधण्यास सुरुवात केली. ज्या नेत्यांचा इंदिरा काँग्रेसमध्ये पक्ष विलीनीकरणास विरोध आहे. त्यांच्यांत करणसिंग, प्रियरंजनदास मुन्शी, उन्नीकृष्णन, टी. ए. पै यांचा समावेश होता. पवारांचा याच लोकासोबत सतत संपर्क होता.

काँग्रेस (स्व) व काँग्रेस (आय) पक्षात ~~व~~ एकता होवू शकेल का यासाठी पक्षाध्यक्ष स्वर्णसिंग यांनी एक समिती नियुक्त केली. या समितीने विलीनीकरणास अनुकूल असे मत व्यक्त केले. या समितीच्या निर्णयावर

......

कार्यकारणीत चर्चा होवून सुचना १० विरुध्द ६ मतानी संमत करण्यात आली [१]
कार्यकारिणीच्या या निर्णयावर दहा प्रदेश समित्यांनी टीका केली. यात आसाम, गुजरात, राजस्थान, हिमाचल, प्रदेश, बिहार, जम्मू काश्मीर, ओरिसा, केरळ, बंगाल व मध्यप्रदेश यांचा समावेश होता. [२]

शरद पवारांनी समातंर कॉंग्रेसचे अधिवेशन बोलावले. कॉंग्रेस ( स्व ) च्या कार्यकारीणीचे तीन सदस्य यावेळी उपस्थित होते. डॉ. करण सिंगानी यावेळी अध्यक्षपद स्वीकारले.. याच वेळी समांतर कॉंग्रेसची स्थापना करुन दादासाहेब रुपवतेंना पक्षाचे अध्यक्ष निवडण्यात आले. महाराष्ट्रात कॉंग्रेसचे कॉंग्रेस(स्व), कॉंग्रेस (आय) ,यस कॉं, समांतर कॉंग्रेस हे चार गट अस्तितीत्वात आले. [३]

दरम्यानच्या काळात महाराष्ट्रातील जिल्हा परिषदेच्या निवडणूका पार पडल्या. यात शरद पवारांच्या समांतर कॉंग्रेसला चांगले यश प्राप्त झाले. या निवडणूकीच्या प्रचारात शरद पवार यांनी कॉंग्रेस (स्व) चे अध्यक्ष स्वरण सिंग यांच्या निष्क्रीय नेतृत्वा विरोधात बंड केले पाहीजे असे आवाहन केले. [४] यावरुन पवारांना कॉंग्रेस (स्व) मध्ये पून्हा स्थान मिळवावयाचे आहे हे स्पष्ट झाले.

या काळातच इंदिरा गांधी व कर्नाटकचे मुख्यमंत्री देवराज अरस यांच्यातील वादाला सुरुवात झाली. कर्नाटक कॉंग्रेस अध्यक्ष पदाच्या निवडीवरुन या वादास प्रारंभ झाला. [५] कर्नाटक प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्ष देवराज अरस होते. त्यांनी अध्यक्ष पद सोडावे अशी मागणी करणारे पत्र डॉ. जाफर शरीफ, विराप्पा मोईली आदि तेरा प्रमुख नेत्यांनी प्रसिध्द केले. [६] देवराज अरस यांची संख्याबळ अजमाविण्याची तयारी होती पण इंदिरा गांधीनी ही सूचना फेटाळून लावली व कर्नाटक प्रदेश कॉंग्रेस समिती बरखास्त केल्याचा निर्णय जाहीर केला. [७] विधी मंडळात देवराज अरस यांनी संख्याबळाची लढाई

......

जिंकली व विधीमंडळ पक्षातून आर. गुंडूराव यांची हकालपट्टी केल्याचे जाहीर केले. [८] देवराज अरसांनी इंदिरा गांधींच्या विरोधात जाहीर टीका सुरु केली. एकाधिकारशाहीने देश एकत्र ठेवता येत नाही व मागील अनुभवाने इंदिरा गांधी काही शिकल्या नाहीत अशी त्यांनी टीका केली.[९] प्रदेश कॉंग्रेस समीतीचे विसर्जन झाल्यानंतर व विधीमंडळात अरस यांना बहुमताचा पाठिंबा आहे हे सिध्द झाल्यानंतर त्यांनी " कर्नाटक कॉंग्रेस " या नावाचा राजकीय पक्ष स्थापन करुन इंदिरा कॉंग्रेसचे विभाजन केले. [१०] देवराज अरस व आंध्रातील चेन्नारेड्डी हे दोन मुख्यमंत्री इंदिरा गांधींच्या पडत्या काळात समर्थक होते. जनता लाटेत व कॉंग्रेस फुटीनंतर ते इंदिरा गांधींच्या सोबत राहून ७८ च्या विधानसभा निवडणूकीत कर्नाटक व आंध्रात सत्ता काबीज करण्यात त्यांनी यश मिळविले होते. मध्यंतरी चिक्कमंगळूर मतदार संघातील लोकसभेच्या पोट निवडणूकीत इंदिरा गांधींच्या विजया पाठीमागे देवराज अरस याचे योगदान महत्वाचे होते. देवराज अरस हे इंदिरा कॉंग्रेस मधून बाहेर पडल्यानंतर शरद पवारांनी त्यांची भेट घेऊन त्यांच्याशी राष्ट्रीय स्तरावर सर्व इंदिरा विरोधी कॉंग्रेस जनांनी एकत्र येण्यासंबंधी चर्चा केली. [११] या काळातच कॉंग्रेस अध्यक्ष स्वरण सिंगानी आपल्या पदाचा राजीनामा देण्याची आपली इच्छा आहे असे पत्र यशवंतराव चव्हाण यांना लिहिले. [१२] यामुळे अरस, पवार यांना एकत्र येण्याची संधी प्राप्त होत होती.

या काळातच महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (स्व) च्या कार्यकारिणीने इंदिरा कॉंग्रेसमध्ये विलीन होण्यासंबंधीचा ठराव संमत केला. या ठरावास फक्त दोनच सदस्यांचा विरोध होता. यामुळे प्रदेश स्तरावर पक्ष संघटना टिकविणे यशवंतराव चव्हाणांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे होते.

कॉंग्रेस (स्व) मध्ये कर्नाटक कॉंग्रेस, समांतर कॉंग्रेस याचे विलीनीकरण होण्यापूर्वी महाराष्ट्रातील वसंतदादा पाटील, नरेंद्र तिडके, यशवंतराव मोहिते आदि नेते इंदिरा कॉंग्रेसमध्ये सहभागी झालेले होते.

.......

यामुळे पवारांच्या प्रवेशात अडथळा शिल्लक नव्हता. कर्नाटक कॉंग्रेस व समांतर कॉंग्रेसचे कॉंग्रेस (स्व) मध्ये विलिनीकरण झाल्यानंतर पक्षाच्या अध्यक्ष पदी अल्पावधीतच देवराज अरस यांची निवड करण्यात आली. अरस अध्यक्ष झाल्यानंतर लोकसभेतील पक्षाचे संख्याबळ वाढल्यामुळे यशवंतराव चव्हाण पुन्हा विरोधी पक्षाचे नेते बनले. [१३] कॉंग्रेस (अ) च्या प्रदेश अध्यक्ष पदी महाराष्ट्रात शरद पवारांची निवड करण्यात आली.

शरद पवार कॉंग्रेस (अ) चे प्रदेश ~~कर~~ अध्यक्ष झाल्यानंतर राज्यातील संघटनात्मक कार्याला वेग आला. जिल्हा परिषदा, साखर कारखाने, सहकारी संस्था यांच्यात सत्ता मिळाल्यामुळे व राज्यात पवारांचे सरकार असल्यामुळे पक्ष वाढीस मदत झाली. म्हणूनच १९८० ची लोकसभा निवडणूक पक्षाने स्वबळावर लढविली. पण त्यांना राज्यात एकच जागा मिळाली. यानंतर विधानसभा बरखास्त झाल्यामुळे पक्षाला निवडणूकीला सामोरे जावे लागले.

## १९८० ची विधानसभा निवडणूक :

विधानसभा बरखास्त झाल्यानंतर राज्यातील राजकीय ध्रुविकरणाच्या प्रक्रियेला वेग आला. जनता पक्षात पुन्हा फुट पडल्यामुळे जनता पक्ष व भारतीय जनता पक्ष असे दोन पक्ष निर्माण झाले. पुर्वाश्रमीच्या जनसंघातील नेते व कार्यकर्ते भाजपत सहभागी झाले. कॉंग्रेस (अ) मधील साखर कारखानदार व स्थानिक कार्यकर्ते यांनी लोकसभा निवडणूकीतील पराभवानतंर इंदिरा कॉंग्रेसमध्ये जाण्यास सुरूवात केली. यामुळे पक्षाच्या संघटनात्मक स्थितीवर परिणाम होऊ लागला.

विधानसभा निवडणूकीत इंदिरा कॉंग्रेसच्या विरोधात एकास एक उमेदवार विरोधी पक्षांच्या वतीने उभे करण्यात अपयश आले. परस्परांच्या समजूतीने काही जागावर तडजोड झाली. जनता पक्षाने १११, कॉंग्रेस (अ) ने १९३, शे. का. पक्षाने ४१ व भाजपने १४५ उमेदवार उभे केले होते.

इंदिरा कॉंग्रेस मध्ये वसंतदादा पाटील, यशवंतराव मोहीते यांचा गट संघटनेवर वर्चस्व मिळविण्यासाठी धडपडत होता. पण इंदिरा

काँग्रेसचे सरचिटणीस ए. आर. अंतुले, प्रमलाताई चव्हाण, रामराव आदिक यांच्या गटाने दादांच्या समर्थकांच्या उमेदवारी देण्याचे टाळले. श्रीमती इंदिरा गांधींच्या विश्वासातील म्हणून अंतुले यांची प्रतिमा होती.

या निवडणूकीत पहिल्यांदाच ब-याच प्रमाणात राज्यातील शेतकरी व मराठा जातीतील लोकांना पक्षाची उमेदवारी नाकारण्यात अंतुलेना यश प्राप्त झाले. त्यामुळे मध्यम वर्गीय शहरी, उच्चवर्णिय, मुसलमान व मागास जमातीतील उमेदवार या निवडणूकित इंदिरा काँग्रेसने उभे केले. काँग्रेस उमेदवारांतफ फक्त ३३ टक्के उमेदवार मराठा जातीतील होते असे त्यावेळी म्हटले गेले. अंतुलेनी मराठेत्तेर एकत्र आणण्याचे राजकारण सुरू केले. त्याचाच परिणाम म्हणून दादा- मोहिते गटास शह बसला. अंतुले आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या निवडीच्या दृष्टीने हे डावपेच करीत होते. [१४]

इंदिरा काँग्रेस मधील अंतर्गत काट- शहाचा फायदा काँग्रेस (अ) चे नेते शरद पवार घेत होते. त्यांनी मराठा जातीतील राजकीय निराशा झालेल्या लोकांना एकत्र करण्याचा प्रयत्न सुरू केला. महाराष्ट्राचे राजकारण दिल्लीच्या आदेशावरून चालणार नाही अशी भूमिका यशवंतराव चव्हाण व शरद पवार यांनी घेतली. या गोष्टीचा फायदा संघटना बांधणीस झाला. विदर्भातील काँग्रेस (इ) चे नाशिकराव तिरपुडे, प्रभाराव हे नेते काँग्रेस (अ) मध्ये सहभागी झाले. यांच्या व्यतिरिक्त दत्ता मेघे, एस. डब्लू. धाबे आदी प्रमुख कार्यकर्ते विदर्भात काम करीत होते.

याच काळात चाकण येथील कांदा आंदोलनामुळे प्रकाशात आलेल्या शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांचा हळु हळु प्रभाव वाढत होता शेतक-याच्या शेती मालाला किफायतशीर भाव मिळावा या मागणीसाठी राज्यातील शेतक-यात असंतोष वाढत होता. शेतकरी संघटनेचा कोणत्याही राजकीय पक्षांशी संबंध नव्हता. या आंदोलनाच्या निमित्ताने निर्माण झालेल्या असंतोषाचा फायदा विधान सभा निवडणुकीत करून घेण्याचा शरद पवारांनी प्रयत्न केला.

" महाराष्ट्राचा स्वाभिमान " अशी भावनिक घोषणा देवून राज्यातील तरुण कार्यकर्त्यांना आपल्या पक्षाकडे आकर्षित करण्याचे तंत्र कॉंग्रेस (अ) नेतृत्वाने अवलंबिले. शरद पवारांच्या पुलोद सरकारबाबत अनेक क्षेत्रातील लोकांना कौतुक वाटत होते. आघाडीचे सरकार यशस्वीपणे चालविण्यात त्यांना आलेल्या यशाबाबत लोकांच्या प्रतिक्रिया समाधानकारक होत्या. त्याचा लाभ त्यांनी निवडणूकीत करुन घेतला.

निवडणूक निकालाचे विश्लेषण :

या निवडणूकीत इंदिरा कॉंग्रेसने २८८ पैकी १८६ जागा मिळवून विधानसभेत स्पष्ट बहुमत प्राप्त केले. जनता व भाजपला अनुक्रमे १७ व १४ जागा मिळाल्या. कॉंग्रेस (अ) ने ४७ जागा मिळवून राज्यात दुसरा क्रमांक मिळविला. शेतकरी कामगार पक्ष १, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष २, भारतीय कम्युनिस्ट पक्ष २, इतर ११ असे इतर संख्याबळ होते.

तक्ता क्रमांक २१

१९८० च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतल पक्षनिहाय स्थिती

| क्र. | पक्ष | लढविलेल्या जागा | जिंकलेल्या जागा | मताचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १) | कॉंग्रेस (इं) | २८६ | १८६ | ४४.५२ |
| २) | कॉंग्रेस (अ) | १९३ | ४७ | २०.७५ |
| ३) | भाजप | १४५ | १४ | ९.३७ |
| ४) | जनता | १११ | १७ | ८.६४ |
| ५) | जनता (च) | २१ | – | ०.१६ |
| ६) | जनता (रा) | १७ | — | ०.१२ |
| ७) | भाकप | १७ | २ | १.३२ |
| ८) | माकप | १० | २ | ०.३४ |
| ९) | शेकाप | ४१ | १ | ५.१५ |
| १०) | रिप. (खो) पक्ष | ४१ | १ | १.३६ |
| ११) | रिप. (ग) पक्ष | ३६ | – | ०.८१ |
| १२) | मु.लीग | ५ | – | ०.१६ |
| १३) | फॉ. ब्लॉक | १ | – | ०.०३ |
| १४) | अपक्ष | ६१३ | १० | ७.८३ |
| | एकूण | १५३५ | २८८ | १००.०० |

संदर्भ : निवडणूक आयुक्तांचा विधानसभा निवडणूक अहवाल १९८४,

---

जानेवारी १९८० मध्ये झालेल्या लोकसभा व जून १९८० मध्ये झालेल्या विधानसभा निवडणूकांचा तुलनात्मक अभ्यास केल्यास एक गोष्ट जाणवते ती म्हणजे इंदिरा कॉंग्रेसच्या मतात शेकडा नऊ टक्के मतांचा फरक पडल्याचा दिसतो. कॉंग्रेस (अ) या नव्याने आलेल्या पक्षास लोकसभेच्या निवडणूकीत एका जागेवर समाधान मानावे लागले होते पण त्यांना विधानसभा निवडणूकीत राज्यात ४७ जागा मिळून मताच्या प्रमाणात शेकडा ९ टक्क्यांनी वाढ झालेली होती. जनता पक्षाच्या मतात यावेळी जनता-भाजप अशी विभागणी झालेली होती. १९७८ च्या निवडणूकीत या पक्षाला ९९ जागा मिळाल्या होत्या पण यावेळी दोघात ( जनता १७ व भाजप १४ ) मिळून फक्त ३१ जागाच मिळाल्या.

इंदिरा कॉंग्रेसला या निवडणूकीत विदर्भातील जागा वाढवता आल्या. १९७८ च्या निवडणूकीत विदर्भात पक्षाला चांगला प्रतिसाद मिळाला होता. मुंबई विभागात यावेळी त्यास चांगले यश मिळविता आले.

कॉंग्रेस (अ) हा राज्यात दुस-या क्रमांकावर असलेल्या पक्षास पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा विभागात चांगले यश मिळाले. साखर कारखानदारी असलेल्या पश्चिम महाराष्ट्रातील व मागासलेल्या मराठवाड्यातील हे यश महत्वाचे वाटते. ग्रामीण भागातील युवा शक्तीला आपल्या पक्षाकडे आकर्षित करण्यात पवार यशस्वी ठरले. ग्रामीण भागातील मतदार संघात पक्षाला चांगले मतदान झाले. शहरी भागात मात्र आशादायक स्थिती नव्हती.

शेतकरी कामगार पक्षाची शक्ती मात्र या निवडणूकीत वाढू शकली नाही. उस्मानाबाद, परभणी, रायगड व सोलापूर या जिल्ह्यात

.....

पक्षाला यश मिळाले. पक्षाने ९ जागा मिळविल्या. कॉंग्रेस (अ) च्या उदयामुळे या पक्षाचे कार्यकर्ते व मतदार विखुरले. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष व रिप. पक्ष (सर्व गट) यांचेही संख्याबळ घटले.

इंदिरा कॉंग्रेसने राज्यातील सर्व विभागात यश प्राप्त केले. कॉंग्रेस (अ) ला विदर्भ व कोंकणात जागा मिळाल्या नाहीत. जनता पक्षाला विदर्भ व मराठवाड्यात एकही जागा मिळाली नाही. मुंबईत जनता - भाजप यांच्या मत विभागणीत कॉंग्रेस (इं)ने २६ जागा जिंकल्या. दलित व अल्पसंख्यांक समाजाचा इंदिरा कॉंग्रेसने पाठिंबा मिळविण्यात यश प्राप्त केले तर मध्यमवर्गीय मतदार निवडणूकीसंबंधी निराश राहिले. हे मुंबईत झालेल्या कमी मतदानावरुन दिसून येते.

मराठवाड्यातील स्थिती :

मराठवाड्यात जानेवारी १९८० त झालेल्या लोकसभा निवडणूकीत मराठवाडा विभागातील आठही जागा इंदिरा कॉंग्रेसने जिंकल्या होत्या पण विधानसभा निवडणूकीत पक्षाला ४६ पैकी २५ जागाच मिळविता आल्या. कॉंग्रेस (अ)ने १७, शेतकरी कामगार पक्षाने २, भारतीय जनता पक्षाने १ व अपक्ष १ असे संख्याबळ होते.

तक्ता क्रमांक २२

......

तक्ता क्रमांक २२

मराठवाड्यातील पक्षनिहाय स्थिती

| क्र. | पक्ष | लढविलेल्या जागा | जिंकलेल्या जागा | माताचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १) | इंदिरा कॉंग्रेस | ४६ | २५ | ४१.३४ |
| २) | कॉंग्रेस (अ) | ४० | १७ | २९.७५ |
| ३) | शेकाप | १४ | २ | ७.५७ |
| ४) | जनता | १६ | - | ५.३९ |
| ५) | भाजप | १७ | १ | ४.८६ |
| ६) | भाकप | ३ | - | १.०५ |
| ७) | माकप | २ | - | ०.८० |
| ८) | जनता (च) | ७ | - | ०.३३ |
| ९) | जनता (रा) | १ | - | ०.०२ |
| १०) | मु. लीग | १ | - | ०.७१ |
| ११) | रिप. पक्ष | १२ | - | १.७२ |
| १२) | अपक्ष | ९३ | १ | ६.४६ |
| १३) | एकूण | २५२ | ४६ | १००.०० |

संदर्भ : निवडणूक निकाल अहवाल, महाराष्ट्र विधानसभा १९८०
महाराष्ट्र शासन प्रकाशन मुंबई १९८५ पान नं. १६८ ते २१३

मराठवाड्यातील ही निवडणूक सर्वार्थाने महत्वाची वाटते. लोकसभा निवडणूकीत या विभागात इंदिरा कॉंग्रेसला सर्व जागा मिळून शे. ५४.५६ टक्के मते मिळाली होती. तर विधानसभा निवडणूकीत मात्र त्यास ४६ पैकी २५ जागा मिळून शेकडा ४१.३४ टक्के मते मिळाली. अवघ्या सहा महिन्याच्या आंत मताच्या प्रमाणात शेकडा तेरा टक्क्यांनी घट झाल्याची दिसते.

.....

पक्षाला बीड जिल्ह्यात तर एकही जागा मिळाली नाही.

या विभागात दुस-या क्रमांकावर असलेल्या कॉंग्रेस (अ) ला ४० जागा लढवून १७ जागा मिळाल्या. लोकसभेच्यावेळी या विभागात पक्षाला शेकडा १२.६६ टक्के मते मिळाली तर विधानसभा निवडणूकीत मतांची वाढ होवून त्यास शेकडा २९.७५ टक्के मते मिळाली. या विभागातील शेतकरी, युवक, विद्यार्थी या घटकांना आकर्षित करण्यात ह्या पक्षाला यश मिळाले.

जनता पक्षाच्या मतात घट झालेली असून त्यांना एकही जागा मिळाली नाही. १९७८ च्या निवडणूकीत या विभागात सोळा जागा मिळवून पक्ष आघाडीवर होता पण आता जनता-भाजप दोघात मिळून एक जागा मिळाली. भारतीय जनता पक्षाने ही एक जागा मिळवून विभागात शे.४.८६ टक्के मते प्राप्त केले. शेतकरी कामगार पक्षाने दोन जागा जिंकल्या. १९७८ च्या निवडणूकीत पक्षाला या विभागात सहा जागा मिळाल्या होत्या. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, रिप. पक्ष, जनता (च) आदी पक्षांना एकही जागा मिळाली नाही. त्यांच्या मतांचे प्रमाण नगण्य होते. या विभागात अपक्षांस फक्त एकच जागा मिळाली.

या विधानसभा निवडणूकीनंतर मराठवाडयात कॉंग्रेस (अ) च्या वाढीस वेग आला. पक्षाच्या हाती स्थानिक व सहकारी संस्थांची सत्ता येवू लागल्यामुळे पक्षाला बळकटी येवू लागली.

मराठवाडयातील आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासाच्या संदर्भात असलेल्या मागासलेपणाचा नेमका फायदा शरद पवारांनी पक्ष वाढीसाठी करून घेतला. शेतक-यांना व युवकांना पवारांच्या नेतृत्वासंबंधी आकर्षण वाटू लागले. विधानसभेत कॉंग्रेस (अ) ला विरोधी पक्ष म्हणून मान्यता मिळाल्यानंतर मराठवाडा विभागात शरद पवारांनी लक्ष केंद्रित करून पक्ष वाढीच्या दृष्टीने काम सुरु केले.

<u>पवार विरोधी पक्ष नेते :</u>

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणूकीत इंदिरा कॉंग्रेसला बहुमत

.....

प्राप्त होवून बॅ. ए. आर. अंतुले यांची मुख्यमंत्री पदावर निवड झाली. अंतुले हे महाराष्ट्राचे असे पहिले मुख्यमंत्री होते की ज्यांना साखर कारखानदार व ग्रामीण भागातील शक्ती केंद्रांचा पाठिंबा नव्हता. अल्पसंख्यांक, मागासवर्गीय, शहरी भांडवलदार, स्मगलर यांच्या जोरावर राज्यातील प्रस्थापित मराठा जमीनदारांच्या राजकारणाला शह देण्याचा त्यांनी प्रयत्न सुरु केला. त्यांच्या मंत्रीमंडळाचा चेहरा बघितल्यानंतर याची कल्पना येते. अंतुलेंच्या मार्फत राज्यातून यशवंतराव चव्हाणांचे नेतृत्व उखाडण्याचा इंदिरा गांधींनी प्रयत्न सुरु केला होता.[१५]

विधानसभेतील जनता, शेतकरी कामगार पक्ष व कॉंग्रेस (अ) या पक्षांनी पुलोद आघाडी स्थापण्याचा निर्णय घेवून पवार यांची विरोधी पक्ष नेतेपदासाठी निवड केली. प्रत्येक वर्षाने नेता बदलण्याचा निर्णय आघाडीने घेतला. विधान परिषदेत जनता पक्षाचे प्रा. ग. प्र. प्रधान यांची विरोधी पक्ष नेतेपदी निवड करण्यांत आली. समान कार्यक्रमाच्या आधारावर जनतेच्या चळवळी उभ्या करण्याचा आघाडीने निर्णय घेतला.

शेतकरी संघटनेचे आंदोलन :

पुणे जिल्ह्यातील चाकण येथे १९८० च्या जानेवारीत कांद्याच्या भावासाठी शरद जोशी यांची चळवळ सुरु झाली. या चळवळीचे प्रारंभीच्या काळातील मर्यादित क्षेत्रात सौम्य स्वरूप होते. अंतुले शासन जून १९८० मध्ये सत्तेतआल्यानंतर सप्टेंबर १९८० मध्ये नाशिक जिल्ह्यात ऊस व कांदा याना किफायतशीर भाव मिळावा या मागणीसाठी शेतकरी संघटनेने चळवळ सुरु केली. उसाला किमान तीनशे रुपये प्रति टन भाव मिळाल्याशिवाय साखर कारखान्यांनी गळीत हंगामाचा शुभारंभ करु नये व हंगाम सुरु करण्याचा कारखान्याने प्रयत्न केला तर संघटना निदर्शने, घेराव कार्यक्रम करील असा इशारा शेतकरी संघटनेने दिला. संघटनेच्या आवाहनाप्रमाणे निफाड सहकारी साखर कारखान्याच्या सर्वसाधारण सभेत तसा ठराव संमत केला.[१६] निफाड

......

सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष श्री. माधवराव बोरास्ते हे राज्य सहकारी साखर कारखाना संघाचे अध्यक्ष होते त्यामुळे या निर्णयाला आंदोलन काळात महत्त्व प्राप्त झालेले होते. संघटनेच्या या निर्णयाचा परिणाम इतरत्र दिसू लागला. नाशिक, जळगांव, धुळे, अहमदनगर या जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांत बेचैनी वाढली. या जिल्ह्यातील अग्नि प्रदिपनाचे कार्यक्रम पुढे जावू लागले. २७ ऑक्टोबर १९८० रोजी श्रीगोंदा येथील साखर कारखान्याच्या अग्नि प्रदीपन कार्यक्रमाच्यावेळी शेतकरी संघटनेने केलेल्या निदर्शनावर पोलिसांनी गोळीबार केला व त्यात नाना चौधरी नांवाचा शेतकरी आंदोलक ठार झाला. या घटनेनंतर शेतकरी संघटनेच्या चळवळीला व्यापक स्वरूप आले. सरकारने सर्व साखर कारखान्यांना २३ ऑक्टोबरच्या आंत हंगाम सुरु करण्याचा आदेश दिला होता. त्यामुळे साखर कारखान्यांचे संचालक मंडळ शेतकरी संघटना व शासन यांच्या दबावाखाली संभ्रमात होते.

शेतकरी संघटनेने याच काळात " रेल्वे रोका - रस्ता रोको " आंदोलन नाशिक जिल्ह्यात सुरु केले. या आंदोलनास हिंसक वळण लागल्यामुळे वित्त व प्राणहानी मोठ्या प्रमाणावर झाली. अवघ्या ३६ तासात आंदोलन परत घेण्याचा निर्णय शेतकरी संघटनेने घेतला. या आंदोलनात शरद जोशी, यांच्या सोबत माधवराव बोरास्ते, माधवराव मोरे, प्रल्हाद पाटील-कराड, रामचंद्र पाटील ( सर्व नाशिक ), भास्करराव बोरावके (कोपरगांव) हे प्रमुख कार्यकर्ते होते. ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून त्यांची प्रतिमा या आंदोलनात निर्माण झाली.

श्रीगोंदा गोळीबारानंतर सुरु झालेल्या रेल्वे रोको आंदोलनामुळे राज्यातील सर्वच राजकीय पक्ष, संघटना व वृत्तपत्रांचे लक्ष या आंदोलनाकडे लागले. या आंदोलना संदर्भात प्रारंभी काळात शरद पवार अनुकूल नव्हते. त्यांनी ऊस न देवून साखर कारखानदारीची कोंडी करणे उचित नाही.

.......

कोणतीही कृती करताना विरोधी पक्षांनी भान ठेवले पाहिजे अशी सावध प्रतिक्रिया औरंगाबाद येथे पत्रकारासोबत बोलताना व्यक्त केली. त्यांना शरद जोशींच्या राजकीय संबंधाचा अंदाज येत नव्हता.[१७]

१० नोव्हेंबर १९८० रोजी शेतकरी संघटनेने आयोजित केलेल्या रस्ता रोको कार्यक्रमामुळे नाशिक, धुळे जिल्ह्यातील निफाड, पिंपळगांव बसवंत, साक्री, खेरवाडी, मालेगांव या भागातील वातावरण तंग बनले होते. खेरवाडी रेल्वे स्थानकास आग लावणाऱ्या जमावावर गोळीबार केल्यामुळे दोन शेतकरी जागीच ठार झाले.[१८] शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी, बोरास्ते, मोरे, पाटील आदींना पोलीसांनी अटक केली होती.

या दरम्यान लोकदलाचे नेते जॉर्ज फर्नांडिस यांनी नाशिक येथे सत्याग्रह करून स्वत:ला अटक करून घेतली.[१९] फर्नांडिसांच्या अटकेदिवशीच शरद जोशी व त्यांच्या सहका-यांची न्यायालयातून सुटका झाली. कॉंग्रेस (अ) व जनता पक्ष यांची डावी आघाडी स्थापन करून या आंदोलनात सक्रीय सहभागी होण्याचा निर्णय सुर्यभान गडाख व निहाल अहमद यांनी घेतला. भारतीय जनता पक्षाच्या उत्तमराव पाटलांनी आपल्या पक्षाचा या आघाडीत समावेश नसल्याचे जाहीर केले.[२०]

महाराष्ट्रातील इंदिरा कॉंग्रेसमध्ये या प्रश्नामुळे अस्वस्थता वाढली होती. खेडचे इंदिरा कॉंग्रेस खासदार रामकृष्ण मोरे यांनी शेतकरी आंदोलनास पाठिंबा व्यक्त केला होता. त्यांनी मुख्यमंत्री अंतुले यांच्या अरेरावी भाषेबाबत खेद व्यक्त केला.[२१] वसंतदादा पाटलांनी दिल्लीतील एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत म्हटले होते की, शरद जोशींच्या आंदोलनाचे स्वरूप राजकीय नसून ते निखाळ शेतक-यांचे आंदोलन आहे.[२२] दादांच्या या वक्तव्यामुळे सत्ताधारी पक्षातील अस्वस्थता वाढली. १५ नोव्हेंबर १९८० पासून शरद जोशींनी कारागृहात आमरण उपोषण सुरु केले. त्यांना सक्तीने आहार देण्याचा आदेश न्यायालयाने दिल्यामुळे २४ नोव्हेंबर रोजी उपोषण सुटले. याच दिवशी खानदेश व मराठवाड्यातील

......

विद्यार्थ्यांनी शैक्षणिक संस्था बंद ठेवून आंदोलनात पाठिंबा व्यक्त केला.[२३] २८ नोव्हेंबर रोजी सुटका झाल्यानंतर १४ डिसेंबर १९८० पर्यन्त आंदोलन स्थगित ठेवण्याचा निर्णय संघटनेच्या नेत्यांनी जाहीर केला. याच दिवशी अंतुले पोटनिवडणूकीत श्रीवर्धनमधून विजयी झाले.[२४]

महाराष्ट्र सरकारने मागण्याच्या संबंधांत वाटाघाटी करण्याचे निमंत्रण दिल्यामुळे पिंपळगांव बसवंत येथे दिनांक १४ डिसेंबर १९८० रोजी पार पडलेल्या शेतकरी संघटनेच्या मेळाव्यात आंदोलन तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करीत असल्याची घोषणा करण्यांत आली.[२५]

शेतकरी संघटनेस बिगर राजकीय स्वरूप कायम ठेवण्यात प्रारंभीच्या काळात यश प्राप्त झाले. त्यांनी आपल्या मागण्याकडे सामान्य शेतक-यांचे लक्ष केंद्रीत केले. त्यांच्या मागण्यात शेतीच्या उत्पादित मालांना उत्पादन खर्चावर आधारित भाव द्यावा ही मागणी प्रमुख होती. शेती हा उद्योग समजून त्याचा विकास करुन शेतक-यांना योग्य मोबदला द्यावा अशी मागणी शेतकरी संघटनेने केली.

शेतकरी संघटनेने आपल्या आंदोलनात काही नवीन तंत्रांचा वापर केल्याचे दिसते. प्रारंभीच्या काळात कांदा, ऊस या नगदी पिकांचा प्रश्न ही घेतला. या पिकांचे क्षेत्र मर्यादित असल्यामुळे त्या क्षेत्रातील शेतक-यांना संघटीत करणे सोयीचे असल्यामुळे हा प्रश्न त्यांनी हाती घेतला.

या आंदोलनात "इंडिया" विरुध्द "भारत" अशी वैचारिक मांडणी शरद जोशी यांनी केली. या संघटनेने सर्वच राजकीय पक्षांवर या काळात टीका केली. राजकीय सत्तेसाठी आपण चळवळ करीत नाही अशी जाहीर भूमिका संघटनेने घेतल्यामुळे लोकांना तिच्यासंबंधी आकर्षण वाटू लागले. डिसेंबर १९८० च्या अखेर संघटनेचे कार्य केवळ नाशिक जिल्ह्यात व सभोवतीच्या तालुक्यात मर्यादित राहिले होते पण नंतर या चळवळीचे दूरगामी परिणाम महाराष्ट्राच्या राजकारणावर झाल्याचेदिसून येवू लागले.

......

शेतकरी दिंडी :

शरद जोशींनी सुरु केलेल्या शेतकरी आंदोलनाच्या कार्यक्षेत्रांत वाढ होवू लागली. या दरम्यानच गुजरात राज्यातील मेहसाणा येथे सुरु झालेल्या शेतकरी आंदोलनास हिंसक वळण लागले. पोलिसांनी केलेल्या गोळीबारात दोन शेतकरी आंदोलक ठार झाले. कापसाला प्रति क्विंटल सातशे भाव मिळावा या मागणीसाठी विदर्भात डॉ. म. गो. ~~ब~~ बोकरे, कोरपे आदी कापूस उत्पादक शेतकरी संघटनेच्या नेत्यांनी वीस नोव्हेंबर १९८० रोजी " चक्का जाम" आंदोलन सुरु केले. विदर्भातील आठ जिल्ह्यात पंधरा हजार शेतकरी सत्याग्रहींना अटक झाली. यवतमाळ परिसरात आंदोलक शेतक-यांच्या जमावाला पांगविण्यासाठी पोलिसांनी केलेल्या गोळीबार व लाठीहल्ल्यात एक शेतकरी जखमी झाला. इतर पाच ठिकाणी लाठीमाराचा वापर करण्यांत आला होता.[२६]

या आंदोलनाच्या काळात राज्यातील जनता पक्ष, शेतकरी कामगार पक्ष व काँग्रेस (अ) या पक्षातील स्थानिक पातळीवरील नेते व कार्यकर्ते प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या या चळवळीच्या संबंधांत आले होते. त्यांनी व्यक्तीगत पातळीवर शेतकरी संघटनेच्या आंदोलनात सहभाग केला. हरिशंकर महाले, निहाल अहमद (जनता) मालोजीराव मोगल, गडाख (काँग्रेस (अ), माधवराव गायकवाड (भाकप) आदी नाशिक जिल्ह्यातील विरोधी पक्षांचे नेते या आंदोलनात सक्रीय होते. या काळात विधानसभेचे विरोधी पक्ष नेते शरद पवार, विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते प्रा. ग. प्र. प्रधान, माकपच्या गोदाताई परूळेकर, जॉर्ज फर्नांडिस आदी नेत्यांनी या भागाचा दौरा केला. फर्नांडिसांनी तर सत्याग्रह करुन कारागृहात शिक्षा भोगली.[२७]

या आंदोलनात राजकीय पक्षात कसलेच स्थान देण्यास शेतकरी संघटनेचे नेते तयार नव्हते. ग्रामीण भागात शेतक-यांच्यांत होत असलेली जागृती व अंतुले सरकारने घेतलेली ताठर भूमिका याचा नेमका फायदा

.......

उठवण्यासाठी डाव्या पुरोगामी लोकशाही आघाडीच्यावतीने २१ नोव्हेंबर ८० रोजी बैठक घेण्यात आली. या बैठकीत सहा राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. शेतक-यांच्या प्रश्नावर व्यापक चळवळ उभी करण्याचा निर्णय घेवून पुढील कार्यक्रम बैठकीत निश्चित करण्यात आला.

१. १ डिसेंबर १९८० रोजी "राज्यव्यापी रस्ता रोको " कार्यक्रम.

२. ६ डिसेंबर १९८० पासून राज्यातील शेतक-यांच्या प्रश्नांवर व्यापक जनमत तयार करण्यासाठी " मालेगांव ते नागपूर " शेतकरी दिंडीचे आयोजन.

३. २५ डिसेंबर १९८० नंतरचा एक आठवडा शेतकरी मागण्यासाठी सप्ताह पाळून राज्यात शेतकरी शेतमजूर यांचे मेळावे, परिषादा, मोर्चे आदींचे आयोजन करुन राज्य व केंद्र शासनाचे या प्रश्नाकडे लक्ष वेधणे.[२७]

या आघाडीचा कार्यक्रम शरद पवारांनी जाहीर केल्यानंतर शरद जोशींनी २८ नोव्हेंबर १९८० रोजी तुरूगातून सुटका झाल्यानंतर आपले आंदोलन १४ डिसेंबर पर्यन्त स्थगित केल्याची घोषणा केली.[२८] पुढे १४ डिसेंबरचे आंदोलन पुन्हा पुढे गेले. संघटनेला आपल्या आंदोलनास या राजकीय पक्षांपासून अलिप्त ठेवावयाचे होते असे या निर्णयावरुन दिसून येते.

डाव्या लोकशाही आघाडीच्या निर्णयानंतर २४ नोव्हेंबर १९८० रोजी वसंतदादा पाटील यांनी शेतकरी आंदोलन योग्य असून या निमित्ताने शेतकरी संघटीत होवू लागला आहे असे मत व्यक्त केले त्यामुळे सत्ताधारी पक्षाला त्याची दखल घ्यावी लागली.[२९] याच काळात भंडारा जिल्ह्यातील भात उत्पादक शेतक-यांनी आपल्या मागण्यासाठी आंदोलन करण्याचा निर्णय जाहीर केला.[२९]

महाराष्ट्र शासनाने असाला दीडशे रुपये अनामत रक्कमेऐवजी

......

एकरी ऐंशी रुपये देण्याचा निर्णय जाहीर केला व उर्वरित मागण्यासाठी सरकारने शेतकरी संघटनेच्या नेत्यांना बोलणी करण्याचे निमंत्रण दिले.[30] यापूर्वी मुख्यमंत्र्यांनी मध्यस्थांच्या सोबत सरकार चर्चा करणार नाही असे वक्तव्ये केली होती.[३१] सरकारचे बोलणी करण्याचे निमंत्रण मिळाल्यानंतर शेतकरी संघटनेने आपले आंदोलन २८ नोव्हेंबर पर्यन्त स्थगित केले.[३२]

शेतकरी संघटनेचे आंदोलन स्थगित झाले तरी राज्यातील डाव्या व लोकशाही आघाडीचे आपले आंदोलन सुरु ठेवण्याचा निर्णय घेवून १ डिसेंबर १९८० रोजी राज्यभर " रस्ता रोको " व बंद पाळण्याचा कार्यक्रम जाहीर केला. मालेगांव ऐवजी जळगांवहून शेतकरी दिंडीचे आयोजन करण्यात येईल अशी घोषणा शरद पवारांनी केली.[३३] राज्यात बंदला चांगला प्रतिसाद मिळाला. दहा हजार लोकांनी सत्याग्रह करुन स्वत:ला अटक करुन घेतली.[३४]

७ डिसेंबर १९८० रोजी जळगांव येथून डाव्या व लोकशाही आघाडीच्या शेतकरी दिंडीला प्रारंभ झाला. जळगांव येथे शरद पवार, बबनराव ढाकणे, सुरेश कलमाडी, प्रभाराव, रामनाथ पांडे, मालोजीराव मोगल, ना. धों. महानोर, ईश्वरलाल जैन आदी प्रमुख नेते व सुमारे दहा हजार शेतकरी सहभागी झाले होते.[३५] जामनेर मध्ये दिंडीचे आगमन झाल्यानंतर आयोजित सभेत दिंडी पाठोपाठ राज्यात शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी जेलभरो आंदोलन सुरु करण्याचा निर्णय नेत्यांनी जाहीर केला.[३६] राज्यभर या संबंधी जागृती निर्माण करण्यासाठी पोस्टर्स, पत्रके लावण्याचा कार्यक्रम आघाडीने हाती घेतला. मुंबईत कामगार संघटनांनी दिंडीला पाठिंबा व्यक्त करणारे भिंतीपत्रके लावली.[३७]

दिंडीचे आगमन विदर्भात झाल्याने तर कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी यात सहभागी होण्याचा निर्णय घेतला. अकोला जिल्ह्यात दिंडीत विद्यार्थी सहभागी झाले.[३८] १४ डिसेंबर १९८० रोजी शेतकरी संघटनेने पिंपळगांव बसवंत येथील मेळाव्यात आंदोलन पुन्हा २२ डिसेंबर पर्यन्त स्थगित करण्याचा निर्णय घेतला.[३९]

......

नागपूर येथे विधीमंडळाचे १५ डिसेंबर १९८० पासून हिवाळी अधिवेशन सुरु झाले. पहिल्याच दिवशी विरोधी पक्षांच्यावतीने दोन्ही सभागृहात शेतक-यांच्या प्रश्नावर कामकाज तहकुबीची सूचना मांडण्यात आली. सभापतीने ही सूचना फेटाळल्यामुळे विरोधकांनी त्या निषेधार्थ सभात्याग केला.[४०] विधीमंडळाचे अधिवेशन एक आठवडा लवकर संपविण्याचा निर्णय सरकारने घेतल्यामुळे दिंडीचा नियोजित कार्यक्रम अगोदर संपवण्याचा निर्णय डाव्या आघाडीने घेतला. सरकारचा हा निर्णय भित्रेपणाचा आहे अशी टीका विरोधी पक्ष नेत्यांनी केला.[४१] महाराष्ट्र शासनाने कापूस उत्पादक शेतक-यांना आर्थिक मदत देण्याचा निर्णय विधीमंडळात १८ डिसेंबर रोजी घोषित केला. विदर्भाच्या औद्योगिक विकासाला चालना देण्याचे आश्वासनही सरकारने याच दिवशी सभागृहात दिले.[४२] मुंबईतील एका कार्यक्रमात बोलताना राष्ट्रपती संजीव रेड्डी यांनी सरकारने शेतक-यांच्या न्याय मागण्याकडे सहानुभूतीने पाहावे असा सल्ला दिला.[४३] या काळात चालू असलेल्या चळवळीमुळे या वक्तव्याला खूपच प्रसिध्दी मिळाली होती.

शेतकरी दिंडी २५ डिसेंबर रोजी नागपूर शहरात पोहोचेल अशी घोषणा करण्यात आली. २० डिसेंबर रोजी आघाडीने राज्यव्यापी बंदची हाक दिलेली होती. पोहूर येथून यशवंतराव चव्हाण, शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली २० डिसेंबर १९८० रोजी निघालेल्या दिंडीला पोलिसांनी अडवून चव्हाण, पवार यांच्यासह १५० जणांना अटक करण्यांत आली. यशवंतरावांना अटकेनंतर भंडारा येथे आणून सोडले.[४४] राजारामबापू पाटील, प्रा. एन. डी. पाटील आदी नेत्यांनाही याच दिवशी अटक झाली. या अटकेच्या संदर्भात बोलताना श्री. यशवंतराव चव्हाण म्हणाले की, शेतकरी व शेतमजूरांची लोकशाही मार्गाने चाललेली चळवळ सरकार दडपशाहीच्या मार्गाने मोडू पाहत आहे. या शासनास जनतेने धडा शिकवावा. न्यायालयाने अटक केलेल्या कार्यकर्त्यांची निर्दोष मुक्तता करून सरकारला चपराक दिलेली आहे असे मत त्यांनी व्यक्त केले.[४५] याच दिवशी शेतकरी संघटनेच्या नेत्यासोबत मुख्यमंत्र्यांनी बोलणी केली. त्यामुळे संघटनेचे आंदोलन ३ जा[illegible] पर्यन्त स्थगित करण्यांत आले.[६४६]

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

डाव्या आघाडीच्या राज्य व्यापी बंदला प्रतिसाद सर्वत्र मिळाला. चव्हाण, पवार, एन. डी. पाटील, राजारामबापू पाटील यांना अटक झाल्या -नंतर दिंडीचे नेतृत्व ~~प्र~~ विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेते प्रा. ग. प्र. प्रधान व डॉ. रविंद्र वर्मा हे करतील अशी घोषणा करण्यात आली.[४७] दिंडी २६ तारखेस नागपूरात विधीमंडळावर जाणार असे पत्रक प्रधान, मेंघे, धाबे यांनी प्रसिध्द केले. डॉ. रविंद्र वर्मा, राजारामबापू पाटील, एन. डी. पाटील व १०२ कार्यकर्त्यांना २७ डिसेंबर पर्यंत न्यायालयीन कोठडी देण्याचा निर्णय वर्धा न्यायनयालयाने दिला.[४८] २३ डिसेंबर रोजी तामीळनाडूत शेतकरी आंदोलन पेटले. आर. नारायण स्वामी नायडू या शेतकरी नेत्याची रासुका -न्वये अटक झाली.[४९] नागपूर शहराच्या सर्वच रस्त्यावर पोलिसांनी आपली यंत्रणा सज्ज ठेवली होती. बुट्टीबोरीहून डॉ. मधु दंडवतेंच्या नेतृत्वाखालील दिंडीच्या तुकडीतील पांचशे कार्यकर्त्यांना बोरीतच अटक करण्यांत आली.

नागपूर शहरातील राणी झाशी चौकात सत्याग्रह करण्याचा निर्णय झाला होता. त्या दिवशी झालेल्या सत्याग्रहात एस. एम. जोशी, जॉर्ज फर्नांडिस, डॉ. चंद्रजीत यादव, देवीलाल, सी. राजेश्वरराव, कर्पुरी ठाकूर, कुंभराम आर्य, मा. गो, बोकरे, सुरेश कलमाडी, दत्ता मेघे, डॉ. चित्त बसू, डॉ. झारखंडराय आदी प्रमुख नेत्यांना अटक झाली. या मोर्चात पन्नास हजार कार्यकर्त्यांना अटक झाल्याचा दावा शरद पवारांनी केला. पोलीसांच्या लाठीमारात डॉ. चित्त बसू, दत्ता मेघे या नेत्यासह अनेक कार्यकर्ते जखमी झाले. या अटकेच्या व लाठीमाराच्या संदर्भात बोलताना यशवंतराव चव्हाणांनी सरकार दडपशाहीचा मार्ग स्विकारत आहे अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.

भारतीय जनता पक्षाने दिंडीत भाग घेतला नव्हता पण सभागृहात या पक्षाच्या आमदारांनी अटकेच्या संदर्भात चर्चा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. राज्यातील सर्वच जिल्ह्यातील आघाडीच्या कार्यकर्त्यांने दिंडीत भाग

......

घेतल्याचा दावा आघाडीच्या नेत्यांनी केला.[५१] तर या दिंडीचा कार्यक्रम अयशस्वी झाल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री अंतुले यांनी व्यक्त केली.[५२] या डाव्या आघाडीचे आंदोलन यशस्वी झाल्याचा दावा करून शरद पवारांनी पुढील कार्यक्रम निश्चित करण्यासाठी सात जानेवारी रोजी बैठक आयोजित केल्याचे जाहीर केले.[५३]

याच दरम्यान म्हणजे २७ व २८ डिसेंबर १९८० रोजी भारत कृषक समाजाचे कोल्हापूर येथे आयोजित केलेल्या अधिवेशनात कृषि मूल्य आयोगाची पुर्नरचना करावी व रास्त शेती मालाला दर देण्यात यावेत या मागण्या करणारे ठराव संमत करण्यांत आले. या अधिवेशनात लोकसभेचे सभापती बलराम जाखार उपस्थित होते.[५४]

शरद पवार व त्यांच्या डाव्या आघाडीने शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे शासनाचे व जनतेचे लक्ष केंद्रीत करण्यासाठी जळगांव ते नागपूर या मार्गावरून काढलेल्या २० दिवसांच्या या दिंडीकडे देशभरातील लोकांचे लक्ष वेधले गेले होते. शेतकऱ्यांच्या दृष्टीने हा एक अभिनव प्रयोग होता. यातून पुढील गोष्टींचा राजकीय व चळवळीच्या दृष्टीने उपयोग झाल्याचा दिसून येतो.

१. विरोधी पक्षांची जनतेच्या प्रश्नासाठी लढा देण्याची तयारी दिसून आली.

२. विदर्भात आजपर्यंन्त विरोधी पक्षाला सामान्य प्रमाणात स्थान मिळत नव्हते. दिंडीच्या निमित्ताने संपर्कास मदत झाली.

३. कापूस उत्पादक व ज्वारी उत्पादक कोरडवाहू शेतकरी या चळवळीत मोठ्या संख्येने सहभागी झाला.

४. शरद पवार यांची शेतकऱ्यांचा विशेषतः मध्यम जातीतील लोकांचे प्रश्न घेवून लढत राहण्याची भूमिका दिसल्यामुळे या घटकातील तरूण कार्यकर्ते त्यांच्यासोबत मोठ्या संख्येनी आले.

.......

५. विरोधी पक्षांच्या आघाडीचे सामुहिक नेतृत्व करण्याची संधी पवारांना मिळाली.

६. पुलोद शासनात असताना घेतलेल्या निर्णयाचा लाभ झालेला समाज पवारांच्या या अभिनव कार्यक्रमात सहभागी झाला त्यामुळे त्यांच्यांत संपर्क वाढला.

महाराष्ट्रात सुरु झालेल्या शेतक-यांच्या चळवळीला दिंडीच्या कार्यक्रमामुळे पोषक वातावरण बनण्यास मदत झाली. जानेवारी १९८१ मध्ये औरंगाबाद येथे २३ व २४ रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीवर काँग्रेस (अ) व इतर डाव्या आघाडीतील पक्षांनी स्वतंत्र मोर्चे काढून शेतक-यांच्या मागण्यांचे शासनाला निवेदने दिली. याचा परिणाम मराठवाडा विभागावर झाला. मराठवाड्यातील युवक व विद्यार्थी संघटनानी स्वतंत्र मोर्चाचे आयोजन करुन शेतक-यांच्या मागण्याकडे शासनाचे लक्ष वेधले. यावेळी सरकार व शेतकरी संघटनेत बोलणी सुरु होती. २३ जानेवारी पासून होणारे आंदोलन पुन्हा स्थगित करण्याची घोषणा करण्यात आली.[५५]

इंदिरा काँग्रेसच्यावतीने दिल्लीत ५ फेब्रुवारी १९८१ रोजी इंदिरा गांधींच्या समर्थनासाठी लाखो शेतक-यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात सरकार शेतक-यांच्या प्रश्नासंबंधी सहानुभूतीने पहावे अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.[५६]

या काळातच महाराष्ट्रातील १८६ नगर परिषदा बरखास्त करण्याचा वटहुकूम राज्य शासनाने काढला. या वटहुकूमाचा विरोधी पक्ष नेत्यांनी लोकशाही विरोधी निर्णय म्हणून विरोध केला.[५७]

<u>तंबाखू आंदोलन</u> :

कांदा व ऊस उत्पादक शेतक-यांचे आंदोलन संपते न संपते तोच निपाणी येथील तंबाखू आंदोलनात प्रतवार भाव मिळावा म्हणून शरद

......

जोशी यांनी १४ मार्च १९८१ पासून सुरुवात केली. तंबाखू उत्पादक शेतकऱ्यांनी बेमुदत रस्ता रोको आंदोलन सुरु केले.[५८] एक एप्रिल पासून रेल्वे रोको आंदोलनाची घोषणा झाली.[५९] कर्नाटक रयत संघटनेचे अध्यक्ष रूद्राप्पा यांनी या आंदोलनास पाठिंबा जाहीर केला.[६०] आंदोलनात ६ एप्रिल १९८१ रोजी पोलिसांनी निपाणी येथे गोळीबार केला. त्यात बारा शेतकरी मृत्यु पावले, चारशे जखमी व चार हजारांना अटक करण्यांत आली.[६१] या गोळीबाराच्या निषेधार्थ सर्वत्र हरताळ पाळण्यात आला. रयत संघटनेने ११ एप्रिल पासून पाठिंब्यासाठी सुरु केलेल्या आंदोलनात हसन येथे गोळीबार होवून तीन जण ठार झाले.[६२] तामिळनाडूचे शेतकरी नेते नारायण स्वामी नायडू यांनी बंगळूर येथें शेतकरी आंदोलन दडपणे शासनाला शक्य नाही असा इशारा दिला.[६३] शरद जोशींवर खुनाचा आरोप ठेवून खटला दाखल करण्यांत आला.[६४] महाराष्ट्र विधान परिषदेत प्रा. एन. डी, पाटील यांनी विचारलेल्या प्रश्नावर कृषिमंत्री गायकवाड यांनी तंबाखू एकाधिकार खरेदीवर शासन विचार करीत आहे असे उत्तर दिले.[६५]

कर्नाटक शासनाने २० एप्रिल १९८१ रोजी कर्नाटक राज्य तंबाखू व्यापार व प्रक्रिया सहकारी संस्था स्थापन केल्याची घोषणा केली. दुसऱ्याच दिवशी हिंडलगे तुरुंगातून शरद जोशींनी आंदोलन मागे घेतल्याचे पत्रक प्रसिध्द केले.[६६] २४ एप्रिल रोजी जोशींची सुटका झाली.

निपाणीच्या तंबाखू आंदोलनामुळे कर्नाटक व महाराष्ट्र सीमा लगतच्या शेतकऱ्यात जागृती निर्माण होण्याचे तर कार्य झाले. पण या आंदोलनाचे महत्वाचे वैशिष्ट म्हणजे विडी कामगार महिलांचा सहभाग फार मोठ्या संख्येने झालेला होता. शेतीमालांच्या किंमतींच्या संदर्भात तंबाखू आंदोलनापासूनच महिलांचा सहभाग सुरु झालेला दिसतो. सतत चाळीस दिवस

......

रस्त्यावर हे आंदोलन सुरु होते. शेवटच्या टप्प्यांत हिंसाचार मोठ्या प्रमाणावर झाला. या आंदोलनातून बाहेर पडल्यानंतर शरद जोशींनी धुळ्यातील दूध-भात आंदोलनाची घोषणा केली.

<u>चव्हाणांचा इंदिरा कॉंग्रेस प्रवेश :</u>

शेतकरी दिंडीनंतर महाराष्ट्रात कॉंग्रेस (अ) च्या संघटनात्मक पातळीवर जोरदार गती प्राप्त झाली. एस. टी. भाडे विरोधी बंद व युवक कॉंग्रेसच्यावतीने ११ मार्च रोजी बेकारीच्या प्रश्नावर पूणे ते मुंबई सायकल मोर्चा आयोजित करण्यात आला होता.[६७] यामुळे संघटना वाढीस पोषक वातावरण बनत होते.

मार्च महिन्याच्या प्रारंभी कॉंग्रेस (अ) चे अधिवेशन पार पडले. यात पक्ष बळकट करण्याचा निर्णय घेण्यात आला. मे १९८१ च्या प्रारंभी अरस कॉंग्रेस व इंदिरा कॉंग्रेस यांच्या विलीनीकरणाची चर्चा सुरु झाली. यशवंतराव चव्हाणांनी प्रारंभी या चर्चेसंबंधी मौन पाळले पण शरद पवारांनी विलीनीकरण प्रस्तावास विरोध केला.[६८]

अरस कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाची निवडणूक १४ जून रोजी होणार होती. त्यासाठी जगजिवनराम व शरद पवार या दोन नांवाची चर्चा सुरु झाली असतानाच निवडणूकीची बैठक पुढे ढकलण्यात आली.[६९] यशवंतराव चव्हाण व देवराज अरस यांच्यातील १७ मे १९८१ रोजी झालेल्या चर्चेस विलीनीकरण प्रश्नावर जून मध्ये कार्यकारीणी बैठक घेण्याचा निर्णय घेण्यात आला.[७०] विलीनीकरणाची वृत्तपत्रात चर्चा सुरु असताना पक्षाचे अध्यक्ष देवराज अरस, सरचिटणीस बांका बिहारीदास व ए. के. ॲन्थोनी यांनी पत्रक प्रसिध्द करुन आपला विरोध स्पष्ट केला.[७१]

महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (अ) च्या बैठकीपूर्वी शरद पवारांनी बैठकीत विलीनीकरणावर चर्चा होणार नाही असे सांगितले पण १८ मे १९८१

......

रोजी झालेल्या प्रदेश समितीच्या बैठकीत विलीनीकरणावर चर्चा करण्यासाठी कार्यकारणीची बैठक त्वरीत बोलवावी अशी मागणी करण्यात आली. या बैठकीत पवारांची प्रदेशाध्यक्षपदी फेरनिवड करून यशवंतरावांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करणारा ठराव संमत करण्यात आला. बैठकीत चव्हाण वगळता ७७ सदस्य उपस्थित होते.[७२]

यशवंतराव चव्हाण व इंदिरा गांधी यांची १९ मे १९८१ रोजी भेट झाली. या भेटीनंतर चव्हाणांच्या प्रवेशासंबंधी दुजोरा मिळाला.[७३] चव्हाणांच्या भूमिकेला वाढता पाठिंबा मिळू लागला असे चित्र दिसत असताना जगजीवनराम यांनी यशवंतराव चव्हाण व शरद पवारांना पक्षातून काढून टाकण्याची मागणी केली.[७४] याच दिवशी पवार परदेश दौऱ्यावर निघून गेले. पक्षाचे सरचिटणीस डॉ. उन्नीकृष्णन यांनी. विलीनीकरणास विरोध करणारे पत्रक प्रसिध्द करून कार्यकारिणीची बैठक २८ मे १९८१ रोजी होईल असे जाहीर केले.[७५] यशवंतराव चव्हाणांनी आपल्या इंदिरा कॉंग्रेस प्रवेशासंबंधी जाहीर प्रतिक्रिया पहिल्यांदा व्यक्त करताना " मी विचार करीत असलेले पक्षांतर नसून " स्वगृह प्रवेश " आहे असे सांगितले.[७६] यशवंतरावांच्या या वक्तव्याचा महाराष्ट्र वगळता बहुतेक प्रदेश समित्यांनी चव्हाणांवर कठोर कार्यवाही करण्याची मागणी केली.[७७]

चव्हाणांना पक्षाध्यक्ष देवराज अरस यांनी २२ मे १९८१ रोजी कारणे दाखवा नोटीस पाठविली. यावर प्रतिक्रिया व्यक्त करताना यशवंतराव चव्हाण म्हणाले, देवराज अरस यांच्याही मनात विलीनीकरण व्हावे असे आहे पण सर्वप्रथम मी तो शब्द उच्चारल्यामुळे त्यांना राग येवून माझ्यावर शिस्तभंगाची कार्यवाही केली आहे.[७८] राष्ट्राच्या संकटकाळी मुख्य प्रवाहात एकरूप व्हावे हीच इंदिरा कॉंग्रेस प्रवेशामागील प्रेरणा आहे. हा निर्णय माझा व्यक्तीगत असून शरद पवार या निर्णयासोबत येतील असे वाटते. पक्षाध्यक्षाच्या नोटीसची मला फिकीर करावी वाटत नाही

......

अशी प्रतिक्रिया चव्हाणांनी कोल्हापूर येथे २७ मे १९८१ रोजी कार्यकर्त्यांसोबत बोलताना व्यक्त केली.[७९]

शरद पवार परदेश दौऱ्यावरून परत आल्यानंतर आपण अंतिम निर्णय जाहीर करू पण पवारांना इंदिरा गांधींच्या विरोधात आपण मध्यंतरीच्या काळात टीका केल्यामुळे भिती वाटत असावी असे मतही यशवंतरावांनी व्यक्त केले. चव्हाणांच्या प्रवेशाबाबत अंतुलेंनी स्वागत केले.[८०]

यशवंतराव चव्हाणांनी पक्ष सदस्यत्वाचा राजिनामा तारेनी २९ मे १९८१ रोजी पक्षाध्यक्ष अरस यांच्याकडे पाठविला व पक्षाध्यक्षाने तातडीने मंजूर केल्याचे जाहीर केले.[८१] यशवंतराव पक्षाबाहेर पडले ही बातमी राज्यात पसरताच त्यांच्या समर्थकांनी पक्ष सदस्यत्व सोडण्यास सुरुवात केली. शरद पवार या निर्णयासोबत येतील अशी अपेक्षा चव्हाणांनी राजिनामा दिल्यानंतर व्यक्त केली.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (अ) च्या ६ जून १९८१ रोजी होणाऱ्या बैठकीत विलीनीकरणाचा निर्णय होईल असे मत पक्षाचे कार्याध्यक्ष शिवाजीराव गिरीधर पाटील यांनी व्यक्त केले.[८२] पण शरद पवारांनी आपण इंदिरा काँग्रेसमध्ये जाणार नाही असे मत बैठकीच्यापूर्वी व्यक्त केले.[८३] यशवंतराव चव्हाणांनी इंदिरा गांधींना पक्ष प्रवेशासंबंधी पत्र लिहिल्यानंतर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (अ) समितीच्या अकरा पदाधिकाऱ्यांनी व २३ आमदारासह ३ जून १९८१ रोजी पक्षातून बाहेर पडण्याचा निर्णय जाहीर केला. यात शिवाजीराव पाटील (कार्याध्यक्ष), प्रभाराव, शामराव कदम, तुकाराम श्रृंगारे ( सर्व उपाध्यक्ष ), गोविंदराव आदिक, मिरासी, नांदे, आर. एस. पाटील, गोविंदराव वंजारी, विलासराव पाटील ( सर्व चिटणीस ), ईश्वरलाल जैन (कोषाध्यक्ष), आ. वोद्रे, आवाडे, प्रतापराव भोसले, डी.डी. चव्हाण, शंकरराव जगताप (उप सभापती), विनायकराव पाटील आदींचा समावेश होता.[८४]

.......

कर्नाटकातील नऊ आमदारांनी याच काळात पक्ष त्याग करुन इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश केला. अनंत राव पाटील, गुरुनाथ कुलकर्णी आदी महाराष्ट्रातील व गुजरातमधील कार्यकर्ते पक्षाबाहेर पडले.[८५]

पक्षातील आमदार व नेते गेलेले असले तरी सामान्य कार्यकर्ते पक्षासोबत आहेत अशी प्रतिक्रिया शरद पवारांनी व्यक्त केली.[८६] पक्षाचे स्वतंत्र अस्तित्व टिकविण्यासंबंधी शरद पवार, ए. के. अन्थोनी, प्रियरंजनदास मुन्शी आदींची १६ जून १९८१ रोजी चर्चा होवून पक्ष न सोडण्याचा निर्णय घेण्यात आला.[८७] महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या २१ जून १९८१ रोजी झालेल्या बैठकीत स्वतंत्र अस्तित्व ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. या बैठकीनंतर बोलताना शरद पवार म्हणाले की, १९८५ पर्यन्त आमचा पक्ष पर्यायी पक्ष म्हणून उभा राहील.[८८]

इंदिरा काँग्रेसमध्ये गेलेल्या २७ आमरादांना ५ जुलै १९८१ रोजी पक्षात अधिकृत प्रवेश दिल्याची घोषणा करण्यात आली. मात्र यशवंतराव चव्हाणांच्या संदर्भात महिन्याअखेर निर्णय घेण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली.[८९] चव्हाणांच्या प्रवेशासंबंधीचा निर्णय सहा महिने ताटकळत ठेवून त्यांना तिष्ठत ठेवले गेले. शेवटी २२ नोव्हेंबर १९८१ रोजी संसदेत पक्षाच्या बाजूने बसण्यासंबंधीची परवानगी देवून चव्हाणांच्या प्रवेश देण्याच्या चर्चेवर पडदा पडला.[९०]

## शरद पवार काँग्रेस (स) चे अध्यक्ष :

यशवंतराव चव्हाण यांनी इंदिरा काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यानंतर शरद पवारांना स्वत:च्या शक्तीवर पक्ष बांधणी करण्याचे आव्हान होते. पक्षातील जवळपास जेष्ठ सहकारी चव्हाणांच्या सोबत गेले होते. त्यांच्या पक्षातील ४७ पैकी ४२ आमदारांनी पक्ष सोडल्यामुळे शरद पवारांचे विरोधी पक्ष नेते पद गेल्याची घोषणा सभापती शरद दिघे यांनी १ ऑगष्ट १९८१ रोजी केली. पक्षात शरद पवार, पद्मसिंह पाटील, कमलकिशोर कदम, राजाराम पाटील, भारत बोन्द्रे (सर्व विधानसभा सदस्य), ना. धों. महानोर,

.....

दत्ता मेघे, धारकर (विधान परिषद सदस्य), आबासाहेब कुलकर्णी, एस. डब्ल्यु. धाबे (राज्यसभा सदस्य) हे लोकप्रतिनिधी शिल्लक होते.

महाराष्ट्रातील पक्षाची नव्याने बांधणी करीत असतानाच पक्षात जगजीवनराम आणि त्यांच्या समर्थकांनी अध्यक्षपदाचा नव्याने वाद सुरु केला. निवडणूक आयोगाने इंदिरा काँग्रेस हीच खरी काँग्रेस असून त्या पक्षास " गाय वासरु " हे चिन्ह म्हणून अधिकृत जाहीर केले. या निकालाच्या विरोधात न्यायालयात जाणार असल्याची घोषणा काँग्रेस (अ) चे सरचिटणीस उन्नीकृष्णन यांनी केली. सर्वोच्च न्यायालयाने अरस काँग्रेसने निवडणूक आयोगाच्या निर्णयाविरुध्द केलेला अर्ज फेटाळल्यामुळे पक्षाला नवीन नांवासाठी अर्ज करणे गरजेचे होते.[९१] इंदिरा काँग्रेसने "गाय वासरु" हे चिन्ह मिळूनही " हाताचा पंजा " हेच आपले चित्र कायम ठेवले.

जगजीवनराम यांच्या समर्थकांनी पक्षाच्या अध्यक्ष पदासाठी जगजीवनराम यांची उमेदवारी जाहीर करुन ५ ऑगष्ट १९८१ रोजी पक्षाच्या महासमितीची बैठक बोलावली. बैठकीचे संयोजक उत्तर प्रदेशाचे शामधर मिश्रा व नाझर हुसेन होते.[९२] या बैठकीस जगजीवनराम उपस्थित राहणार असे जाहीर झाल्यानंतर पक्षाध्यक्ष अरस यांनी त्यांना उपस्थित राहिल्यास न राहण्याचे आवाहन केले व बैठकीस उपस्थित राहिल्यास शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल असा इशारा दिला.[९३] शामधर मिश्रा, नाझर हुसेन यांची पक्षातून हकालपट्टी केल्याचे जाहीर करण्यांत आले. पक्षाध्यक्षाचे आवाहन जगजीवनराम यांनी फेटाळून लावले व बैठकीस हजर राहणार असल्याचे पत्रक त्यांनी प्रसिध्द केले.[३४]

५ ऑगस्ट १९८१ रोजी झालेल्या बैठकीत समांतर काँग्रेस स्थापन करण्याचा निर्णय घेवून पक्षाध्यक्ष पदावर जगजीवनराम यांची निवड करण्यात आली. या बैठकीत देवराज अरस यांची पक्षाध्यक्ष पदावरुन हकालपट्टी करणारा ठराव संमत करण्यात आला. या बैठकीस शामधर मिश्रा, नाझर हुसेन, सैगल, निहालसिंग, गणपत भगत आदी प्रमुख नेते उपस्थित होते.[९५] जनता पक्षातून

.......

सव्वावर्षापूर्वी जगजीवनराम बाहेर पडून अरस काँग्रेसमध्ये सहभागी झाले होते. पण त्यांना या पक्षातही फार काळ राहता आले नाही. त्यांच्या नवीन पक्ष स्थापनेनंतर अरस काँग्रेसकडे फक्त बारा संसद सदस्य शिल्लक होते.समांतर काँग्रेस पुढे काँग्रेस (जे) या नांवाने ओळखली जावू लागली.

लोकदलाचे सरचिटणीस मधु लिमये यांनी लोकदल, जनता व काँग्रेस (अ) या तीन पक्षांच्या विलीनीकरणाचा प्रस्ताव सर्व पक्षासमोर ठेवला होता पण या विलीनीकरण प्रस्तावास आपण अनुकूल नसल्याची प्रतिक्रिया शरद पवार व राजारामबापू पाटील यांनी व्यक्त केली. यामुळे विलीनीकरणाचा प्रस्ताव येथेच काही काळ थांबला.[९६]

२६ ऑगष्ट १९८१ रोजी अरस काँग्रेसच्या कार्यकारिणीची बैठक मुंबईत आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीपूर्वी एक दिवस अगोदर पक्षाध्यक्ष देवराज अरस यांनी आपल्या पदाचा राजिनामा दिला. त्यांनी राजिनाम्याचे कारण मात्र नमूद केलेले नव्हते पण आपल्या फेरनिवडीसाठी पक्षात विरोध सुरु झालेला आहे म्हणून त्यांनी पदाचा राजिनामा दिला असे त्यांचे मत होते. [९७] अरस यांच्या राजिनाम्यामुळे पुन्हा पक्षापुढे पेच निर्माण झाला. या बैठकीचे तात्पुरते अध्यक्षपद स्वीकारून कामकाज चालवावे अशी पक्ष सहका-यांची विनंती अरस यांनी स्वीकारली.

कार्यकारिणी बैठकीत पक्षाच्या हंगामी अध्यक्षपदी महाराष्ट्र प्रदेश समितीचे अध्यक्ष शरद पवार यांची सर्वानुमते निवड करण्यांत आली.[९८] पक्षाध्यक्ष म्हणून निवड झाल्यानंतर शरद पवारांनी देशातील डाव्या व लोकशाहीवादी पक्षाशी आपला पक्ष पुढील काळात समझोता करील अशी ग्वाही दिली. या बैठकीत संघटनात्मक बांधणी करण्याचा निर्णयही घेण्यात आला.

शरद पवार पक्षाध्यक्ष झाल्यानंतर केरळमध्ये डाव्या आघाडीच्या नयनार मंत्रीमंडळातून बाहेर पडण्याचा केरळ प्रदेश काँग्रेस (अ) ने निर्णय घेतल्यामुळे संघटनात्मक पातळीवर पेच निर्माण झाला. या निर्णयामागे ॲन्टोनी गटाची प्रमुख भूमिका होती.[९९] मुंबई येथे १९ ते २१ ऑक्टोबर १९८१

......

रोजी झालेल्या कार्यकारिणी बैठकीत प्रदेश समितीच्या निर्णयास मान्यता दिल्यामुळे नयनार यांनी मंत्रीमंडळाचा २० ऑक्टोबर रोजी राजिनामा सादर करून डाव्या आघाडीचे सरकार संपुष्टात आणले.

या बैठकीतच पक्षाचे कॉंग्रेस (अ) हे नांव बदलून "समाजवादी कॉंग्रेस " असे नांव धारण करण्याचा कार्यकारिणीने निर्णय घेतला. व्यक्तीवाचक नांवामुळे पक्षाच्या वाढीला मर्यादा पडतात. पक्षाध्यक्ष बदलला तरी ही पक्षाचे नांव कायम स्वरूपात असावे अशी या मागची प्रेरणा आहे, असे मत कार्यकारिणीच्या बैठकीत व्यक्त करण्यात आले.[१००] या बैठकीत संघटनात्मक बांधणीसाठी वेगवेगळ्या राज्यांची जबाबदारी वाटून देण्यात आली.

केरळमधील डाव्या आघाडीचे सरकार कोसळल्यानंतर एक महिन्यात नवे सरकार बनविण्याची राजकीय प्रक्रिया सुरू झाली. त्या काळात राज्यात राज्यपालांची राजवट होती. कॉंग्रेस (स) चे प्रदेशाध्यक्ष ए. के. ॲन्टोनी, वायलर रवी यांनी राज्यात इंदिरा कॉंग्रेसला पाठिंबा देण्यात यावा यासाठी पक्षात प्रयत्न सुरू केले. के. पी. उन्नीकृष्णन, पी. सी. चाको या केरळमधील नेत्यांचा या पाठिंब्यास विरोध होता. २९ नोव्हेंबर १९८१ रोजी झालेल्या कार्यकारिणी बैठकीत केरळ मधील इंदिरा कॉंग्रेसला सरकार बनविण्यासाठी पाठींबा न देण्याचा निर्णय झाला असे निवेदन देवकांत बारुआ व अंबिका सोनी यांनी प्रसिध्द केले. या निर्णयावर " दु:खद निर्णय " अशी प्रतिक्रिया ॲन्टोनी यांनी व्यक्त केली.[१०१]

पक्षाच्या मध्यवर्ती कार्यकारिणीचा निर्णय झाला असला तरी ए. के. ॲन्टोनी यांनी इंदिरा कॉंग्रेसला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतल्यामुळे करूणाकरण यांचे संयुक्त आघाडीचे सरकार २८ डिसेंबर १९८१ रोजी सत्तेवर आले. ए. के. ॲन्टोनी व त्यांच्या समर्थकांनी आपला स्वतंत्र गट स्थापन करून कॉंग्रेस (स) सोडली. पुढे हा गट इंदिरा कॉंग्रेसमध्ये अल्पकाळातच विलीन करण्यांत आला.

.......

शरद पवार पक्षाचे अध्यक्ष झाल्यानंतर महाराष्ट्रात अंतुले जावून बाबासाहेब भोसले जानेवारी १९८२ मध्ये मुख्यमंत्री पदावर आले होते. या काळात कॉंग्रेस (स) चे विद्यमान सदस्य राजाराम पाटील यांच्या निधनामुळे उमरगा (जिल्हा उस्मानाबाद) येथील रिकाम्या झालेल्या विधानसभेच्या जागेची पोटनिवडणूक जाहीर झाली होती. मराठवाड्यातील १७ पैकी १४ आमदार यापूर्वी इंदिरा कॉंग्रेसमध्ये गेले होते. त्यामुळे या निवडणूकीकडे कॉंग्रेस (स) प्रतिष्ठेची निवडणूक म्हणून पाहत होते. कॉंग्रेस (स) चे उमेदवार भालचंद्र बिराजदार या निवडणूकीत ६८३० मताधिक्यांनी विजयी होवून पक्षाने आपली जागा कायम राखली. याचवेळी झालेल्या ठाणे लोकसभा निवडणूकीत भाजपचे जगन्नाथ पाटील विजयी झाले.[१०२]

दरम्यान कॉंग्रेस (स) च्या पुढे पुन्हा एप्रिल १९८२ मध्ये एक नवा प्रश्न उपस्थित झाला. पक्षाचे माजी अध्यक्ष देवराज अरस व कर्नाटक प्रदेश समितीच्या सर्व सदस्यांनी कॉंग्रेस (स) सोडून प्रादेशिक पातळीवर नवा पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेतला.[१०३] या संदर्भात बोलताना देवराज अरस म्हणाले की, उपेक्षित, शोषित, मागासवर्गीय आणि अल्पसंख्यांक समाजावरील अन्यायांचा प्रतिकार करण्यासाठी सर्व समविचारी पक्षांचे विलीनीकरण घडवून आणण्याकरिता प्रांतिक पातळीवर पक्ष स्थापन करण्याशिवाय आम्हाला पर्याय शिल्लक नाही. कॉंग्रेस (स) चा प्रवास दिशाहिन आहे. त्यांच्या लवचिक धोरणामुळे पक्षातर्फे इतर विरोधी पक्षांचा प्रचार करणे अवघड बनले आहे. यामुळेच बाहेर पडण्याचा निर्णय घेतला असून प्रांतिक स्तरावरील कार्यकर्त्यांचा मेळावा मे मध्ये घेण्याचा निर्णय त्यांनी जाहीर केला. मे अखेर झालेल्या मेळाव्यात " कर्नाटक क्रांती रंगा " नांवाच्या पक्षाची अधिकृत घोषणा करण्यात आली.

शरद पवार पक्षाचे अध्यक्ष झाल्यानंतर राष्ट्रीय स्तरावर विरोधकांचे ऐक्य घडवून आणण्याची कल्पना पुढे येत होती. समान कार्यक्रमाच्या आधारावर विरोधकांनी एकत्र यावे असा सर्वसाधारण सुर श्रीनगर, विजयवाडा

......

येथे झालेल्या बैठकीत दिसून आला. पक्षाचे स्वतंत्र अस्तित्व ठेवण्याच्या प्रक्रियेत पक्षाला खूपच वादळांना तोंड द्यावे लागत होते. यशवंतराव चव्हाण व महाराष्ट्रातील सहकारी इंदिरा कॉंग्रेसमध्ये गेल्यामुळे राज्यात पुन्हा नव्याने पक्ष बांधणी करणे गरजेचे होते. यशवंतरावांचे नांव यामुळे या कामात उपयोगी करणारे नव्हते. राष्ट्रीय स्तरावर अँन्टोनी, जगजीवनराम, अरस इत्यादी नेत्यांनी पक्ष सोडल्यामुळे इतर राज्यातील पक्ष संघटना बांधण्याची जबाबदारी पक्षाध्यक्ष झाल्यामुळे मिळाली होती. त्याचा योग्य लाभ घेणे त्यांच्या दृष्टीने गरजेचे होते.

वरील सर्व आव्हानाला व महाराष्ट्रातील सत्ताधारी पक्षातील अंतर्गत गटबाजी व त्यांच्यातील वाढत चाललेल्या असंतोषाचा राजकीय फायदा कॉंग्रेस (स) कसा घेईल यावर पक्षाचे भवितव्य अवलंबून होते. पक्षाचे संघटन बांधून नवा कार्यक्रम देणे गरजेचे होते. आपले अस्तित्व कायम ठेवून इतर विरोधी पक्षांचे सहकार्य व समन्वय करणे हे कार्यही समोर होते.

शरद पवारांना राज्य पातळीवर पर्यायी नेतृत्व उभे करण्याच्या दृष्टीने भक्कम शक्ती उभी करुन व यंत्रणा निर्माण करुन त्याचा वापर करणे, ग्रामीण भागात संघटना कार्यरत ठेवणे हे महत्वाचे कार्य एका बाजूला होते, व दुसरीकडे राष्ट्रीय स्तरावर पक्षाचे अस्तित्व टिकविण्यासाठी संघटनात्मक बाबीत लक्ष देवून व्यापक स्तरावर विरोधकांचे ऐक्य व समन्वय घडवून आणणे ही एक प्रमुख जबाबदारी या काळात आलेली होती. या स्थितीत पवार पक्षाचे अध्यक्ष म्हणून राष्ट्रीय राजकारणात प्रवेश करीत होते.

१९८१ ते १९८३ हा काळ पवारांच्या व कॉंग्रेस (स) च्या दृष्टीने महत्वाचा होता. कारण ज्यांच्या भरवशावर हे राजकारण केले ते यशवंतराव चव्हाण आपल्या प्रतापराव भोसले, विनायकराव पाटील, गोविंदराव आदिक, श्रीपतराव बोन्द्रे वगैरे समर्थकासह कॉंग्रेस (इं) मध्ये गेले होते.आणि त्यांच्या

......

सोबत ४२ आमदारांनी पक्षाचा त्याग केला. शरद पवारांना त्यावेळी फक्त आठ आमदारांचाच पाठिंबा होता. डॉ. पद्मसिंह पाटील यांचा अपवाद वगळता एकही प्रथितयश नेता त्यांच्या पाठीमागे नव्हता. चव्हाण व त्यांच्या खा-या पाठीराख्यांचा पाठिंबा नसताना स्वत:च्या पायावर त्यांना आता नवा पक्ष उभा करावयाचा होता. सर्व जेष्ठ पाठीराखे कॉंग्रेस (इं) त गेल्यामुळे पवार यात यशस्वी होणार नाहीत असाच ब-याच जणांचा अंदाज होता. [१०४]

पण पवारांनी स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवून नवा पक्ष उभारण्याचा निर्णय खालील कारणामुळे घेतला.

१. इंदिरा कॉंग्रेसमध्ये अंतुले - आदिक वगैरे जुन्या इमानदारांचे वर्चस्व आहे त्यामुळे वसंतदादाप्रमाणेच यशवंतरावांना तेथे जावून फारसे कांही करता येणार नाही. कारण इंदिरा गांधींच्या धोरणात तसा मूलभूत बदल झालेला नाही.

२. अंतुले यांचा राजिनामा व त्यानंतर झालेले महाराष्ट्रातील राजकारणातील फेरबदल यामुळे त्या पक्षात राहून राजकारण करणेपेक्षा बाहेर राहून राजकारण करणे जास्त सोयीचे होईल.

३. आमदार व मोठे पुढारी कॉंग्रेस (इं) मध्ये गेले असले तरी आपल्याला पाठिंबा देणारा तरूण मतदार कायम आहे व तो आपल्या पाठीमागे राहील.

४. शेतकरी संघटनेचे आंदोलन त्याचा लाभ घेता येईल.

५. पश्चिम महाराष्ट्रापेक्षा अविकसित मराठवाडा व विदर्भ भागावर लक्ष केंद्रीत करून शेतकरी संघटनेच्या कामाचा व कार्यकर्त्यांचा फायदा घेणे, त्यांचे Support structure वापरणे, जनतामधून भ्रमनिरास झालेल्या गटाचे एकत्रीकरण करणे.

६. राष्ट्रीय स्तरावरील प्रश्नात लक्ष घालून सरकारच्या विरोधी जनमत तयार करणे.

.....

१९८० ते १९८३ हा काळ कॉंग्रेस (स) च्या दृष्टीने महत्वाचा होता. या काळात १९८० साली पक्षाने आपले राजकीय सामर्थ्य दाखवून दिले. पण शरद पवारांचे विरोधी पक्षाचे राजकारण पक्षातील जेष्ठ मंडळींना अडचणीचे वाटू लागले म्हणून त्यांनी पक्षत्याग केला पण पवार आपल्या जागी खांबीर राहिले आणि नव्याने कॉंग्रेस (स) ची पुनर्घटना करण्याची तयारी त्यांनी सुरु केली. आपल्या नव्या पाठीराख्यांच्या व युवकांच्या मदतीने हे अवघड काम साध्य करता येईल अ याची त्यांना खात्री वाटत होती.

---------------------------////////////---------------------------

# प्र क र ण ति स रे

## कॉं ग्रे स (स) चा उ द य

### सं द र्भ सू ची


१. दैनिक मुंबई सकाळ मुंबई दि. २५-११-७८

२. उक्त दि. २९-११-७८

३. दैनिक लोकसत्ता, मुंबई दि. ८-१-७९

४. पुणे येथे २९ एप्रिल ७९ रोजी झालेल्या समांतर कॉंग्रेसच्या मेळाव्यातील शरद पवार यांचे भाषण
दैनिक मराठवाडा, औरंगाबाद दि. ३०-४-७९

५. उक्त दि. १०-६-७९

६. उक्त दि. ११-६-७९

७. दैनिक लोकसत्ता मुंबई दि. १६-६-७९

८. उक्त दि. २१-६-७९

९. दैनिक मराठवाडा, औरंगाबाद दि. २२-६-७९

१०. उक्त दि. २५-६-७९

११. उक्त --"--

१२. उक्त --"--

१३. चौसाळकर ए. एस. महाराष्ट्राच्या राजकारणातील नवे प्रवाह - एक अवलोकन गर्जना (कोल्हापूर) दिवाळी अंक १९८३.

१४. चौसाळकर ए. एस. " Recent trends in Politics of Maharashtra " कावळेकर के. के. व चौसाळकर ए. एस. संपादित " भारतातील राजकीय विचार, चळवळी व राजकारण " अजब पुस्तकालय कोल्हापूर १९८६ मधील लेख.


......

१५. उक्त

१६. पळ्ळेकर विजय, योध्दा शेतकरी, राजहंस प्रकाशन पुणे १९८१ पान नं. ७५

१७. दैनिक मराठवाडा, औरंगाबाद दि. ७-११-८०

१८. दैनिक लोकसत्ता, मुंबई दि. ११-११-८०

१९. उक्त दि. १६-११-८०

२०. पळ्ळेकर विजय, उपरोल्लिखित पान नं. २०४

२१. उक्त पान नं. २१२

२२. उक्त पान नं. २१४

२३. दैनिक मराठवाडा औरंगाबाद दि. २५-११-८०

२४. दैनिक लोकसत्ता, मुंबई दि. २९-११-८०

२५. दैनिक मराठवाडा, औरंगाबाद दि. १५-१२-८०

२६. पळ्ळेकर विजय उपरोल्लिखित पान नं. २१२

२७. दैनिक मुंबई सकाळ,मुंबई दि. २२-११-८०

२८. उक्त दि. २५-११-८०

२९. दैनिक मराठवाडा औरंगाबाद दि. २८-११-८०

३०. दैनिक पुढारी,कोल्हापूर दि. २९-११-८०

३१. उक्त दि. १७-११-८०

३२. उक्त दि. २९-११-८०

३३. दैनिक महाराष्ट्र टाईम्स,मुंबई दि. ३०-११-८०

३४. उक्त दि. २-१२-८०

३५. दैनिक पुढारी, कोल्हापूर दि. ८-१२-८०

३६. -""- दि. ९-१२-८०


.....

| | | |
|---|---|---|
| ३७) | दैनिक मुंबई सकाळ, मुंबई | दि. १०-१२-८० |
| ३८) | दैनिक पुढारी, कोल्हापूर | दि. १६-१२-८० |
| ३९) | दैनिक मराठवाडा औरंगाबाद | दि. १५-१२-८० |
| ४०) | दैनिक पुढारी, कोल्हापूर | दि. १६-१२-८० |
| ४१) | उक्त | दि. १८-१२-८० |
| ४२) | उक्त | दि. १९-१२-८० |
| ४३) | उक्त | --"-- |
| ४४) | दैनिक मराठवाडा औरंगाबाद | दि. २१-१२-८० |
| ४५) | उक्त | --"-- |
| ४६) | उक्त | --"-- |
| ४७) | दैनिक पुढारी, कोल्हापूर | दि. २१-१२-८० |
| ४८) | उक्त | दि. २४-१२-८० |
| ४९) | उक्त | --"-- |
| ५०) | उक्त | दि. २५-१२-८० |
| ५१) | दैनिक मराठवाडा औरंगाबाद | दि. २६-१२-८० |
| ५२) | उक्त | --"-- |
| ५३) | दैनिक पुढारी, कोल्हापूर | दि. २७-१२-८० |
| ५४) | उक्त | दि. २८ व २९-१२-८० |
| ५५) | दैनिक मराठवाडा, औरंगाबाद | दि. २३ व २४ जानेवारी १९८१ |
| ५६) | दैनिक पुढारी, कोल्हापूर | दि. २-२-८१ |
| ५७) | उक्त | दि. ६-२-८१ |
| ५८) | उक्त | दि. १५-३-८१ |
| ५९) | उक्त | दि. २७-३-८१ |
| ६०) | उक्त | दि. २७-३-८१ |

६१) दैनिक सकाळ,दै.पुढारी कोल्हापूर दि. ७-४-८१
६२) दैनिक पुढारी कोल्हापूर दि. १२-४-८१
६३) उक्त दि. १५-४-८१
६४) उक्त दि. १९-४-८१
६५) दैनिक महाराष्ट्र टाईम्स मुंबई दि. १८-४-८१
६६) दैनिक पुढारी, कोल्हापूर दि. २१-४-८१
६७) उक्त दि. १२-३-८१
६८) उक्त दि. ७-५-८१
६९) उक्त दि. ९-५-८१
७०) उक्त दि. १५-५-८१
७१) दैनिक महाराष्ट्र टाईम्स मुंबई दि. १७-५-८१
७२) उक्त दि. १९-५-८१
७३) उक्त दि. २०-५-८१
७४) दैनिक पुढारी कोल्हापूर दि. २२-५-८१
७५) उक्त --"--
७६) उक्त --"--
७७) दैनिक महाराष्ट्र टाईम्स मुंबई दि. २४-५-८१
७८) उक्त --"--
७९) दैनिक पुढारी कोल्हापूर दि. २५-५-८१
८०) उक्त दि. २६-५-८१
८१) उक्त दि. २७-५-८१
८२) उक्त दि. २-६-८१
८३) दैनिक महाराष्ट्र टाईम्स मुंबई दि. ६-६-८१
८४) उक्त दि. १०-६-८१
८५) उक्त दि. १३-६-८१
८६) उक्त दि. १४-६-८१
८७) दैनिक पुढारी कोल्हापूर दि. १७-६-८१
८८) उक्त दि. २२-६-८१

......

८९) दैनिक पुढारी कोल्हापूर दि. ६-७-८१

९०) उक्त दि. २३-११-८१

९१) उक्त दि. १५-८-८१

९२) उक्त दि. २-८-८१

९३) दैनिक महाराष्ट्र टाईम्स मुंबई दि. ४-८-८१

९४) दैनिक मुंबई सकाळ, मुंबई दि. ५-८-८१

९५) दैनिक पुढारी, कोल्हापूर दि. ६-८-८१

९६) उक्त दि. ११-८-८१

९७) उक्त दि. २५-८-८१

९८) दै. महाराष्ट्र टाईम्स, मुंबई दि. २६-८-८१

९९) उक्त दि. २०-१०-८१

१००) उक्त दि. २२-१०-८१

१०१) दैनिक पुढारी, कोल्हापूर दि. ३०-११-८१

१०२) दैनिक मराठवाडा औरंगाबाद दि. ३०-५-८१

१०३) दैनिक पुढारी, कोल्हापूर दि. ३०-४-८१

१०४) चौसाळकर अशोक, शरद पवार - " काल, आज आणि उद्या " स्मवेध दिवाळी अंक १९८३.


----------------------/////////////----------------------